**कोसरी लघु पाटबंधारे प्रकल्प ता. आरमोरी जि. गडचिरोली योजनेस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर**

महामंडळ निर्णय क्रमांक/१३१/विपाविम/कांता६(२)/(धा.क्र.कोसरी लघु प्रकल्प)/तृतीय सुप्रमा/२०२३ दिनांक. १५/०७/२०२३

**संदर्भ :-**
१. महामंडळाचे निर्णय क्र./२३९/विपाविम/कांता-६/कोसरी सुप्रमा/२०१७ दि.११.०८.२०१७
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ.) दि.०९/०९/२०१५
३. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे पत्र क्र. रातांसस(१)/कक्ष-१(मु)/कोसरी ल.पा. (धा.क्र.१८/२०२२)/०४/२०२२ दि. ०२.०१.२०२३
४. अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.०२/०६/२०२३ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक- २०२३/(३७/२०२३)/लपा दि.१३/०६/२०२३
५. विपाविम नियामक मंडळाचे दि. १९/०६/२०२३ च्या बैठकीचे ८३ व्या बैठकीतील ठराव क्र. ८३/३८

**प्रस्तावना** :

कोसरी लघु पाटबंधारे प्रकल्प या महामंडळांतर्गत नक्षलग्रस्त, आदिवासी क्षेत्रातील असुन गडचिरोली जिल्हयातील आरमोरी तालुक्यातील कोसरी गावाजवळ वाहणाऱ्या कोसरी नाल्यावर बांधकामाधीन आहे. सदर प्रकल्पाव्दारे गडचिरोली जिल्हयातील आरमोरी तालुक्यातील ०३ गावातील ४७५ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

कोसरी लघु पाटबंधारे प्रकल्पास महामंडळाचे निर्णय विपाविमं, नागपूर निर्णय क्र./२३९/विपाविम/कांता-६/कोसरी सुप्रमा/२०१७ दि. ११.०८.२०१७ नुसार सन २०१४-१५ चे दरसुचीवर आधारित रु. ३८.७० कोटी (रु. अडतीस कोटी सत्तर लक्ष फक्त) इतक्या रकमेस व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त करण्यात आली होती.

बांधकामाचे दरम्यान, प्रकल्पाच्या खर्चात दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ, जादा दराची निविदा स्विकृतीमुळे वाढ, भुसंपादन खर्चातील वाढ, अपुऱ्या तरतुदी, इतर कारणे व अनुषंगीक खर्च इत्यादी कारणामुळे वाढ झाली असुन प्रकल्पाची अद्यावत तृतीय सुप्रमा अंदाजपत्रकातील प्रस्तावित किंमत ही लगतच्या सुप्रमा किंमती पेक्षा रु. २२.८३ कोटीने वाढली असुन वाढीची टक्केवारी ५९.१३% इतकी आहे.

कोसरी लघु पाटबंधारे प्रकल्पाचा तृतीय सुप्रमा बाबतचा छाननी अहवाल राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती (१), नाशिक यांचे दि. १५.११.२०२२ रोजीच्या १७८ बैठकीत अंतिम करण्यात आला असुन पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार प्राप्त झालेला आहे.

कोसरी लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या तृतीय सुप्रमा प्रस्तावावर अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे अध्यक्षतेखाली दि. ०२.०६.२०२३ रोजी झालेल्या मा. सचिव उपसमितीचे बैठकीत (संदर्भ-४) चर्चा होवून राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या तपासणी अहवालातील

मुद्दा क्र. २६ व २७ ची पुर्तता करण्याच्या तसेच प्रकल्पाची सर्व कामे जुन २०२४ पर्यंत पुर्ण करणेच्या अटीच्या अधीन राहून प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सुप्रमा देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. १९/०६/२०२३ झालेल्या नियामक मंडळाचे ८३ व्या आढावा बैठकीतील ठराव क्र.८३/३८ नुसार कोसरी लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या रु. ६१.५३ कोटी अंदाजित किंमतीस तृतीय सुप्रमा प्रस्तावास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या तपासणी अहवालातील मुद्दा क्र. २६ व २७ ची पुर्तता करण्याच्या अटीच्या अधीन राहून व सचिव स्तरीय उपसमितीची सुप्रमास मंजुरीची शिफारस लक्षात घेता मान्यता दिली असुन याबाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करण्याकरीता नियामक मंडळाने सर्वानुमते मान्यता प्रदान केलेली आहे. (संदर्भ-५)

सदर प्रकल्पाचे व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता किंमतीच्या तुलनेत तृतीय सुधारित प्रकल्प अहवालाची किंमत रु. २२.८३ कोटीने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | बाब | वाढ (रु कोटी) | मंजुर द्वितीय सु.प्र.मा. किंमतीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी | एकुण वाढीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | दरसूचीतील बदलामुळे | ८.०२ | २०.७३ | ३५.०६ |
| २ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | ६.३ | १६.२८ | २७.५३ |
| ३ | संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ४ | नविन तरतुदींमुळे झालेली वाढ | २.८७ | ७.४२ | १२.५५ |
| ५ | इतर कारणामुळे झालेली वाढ | ४.८१ | १२.४३ | २१.०२ |
| ६ | अनुषंगिक खर्चात झालेली वाढ | ०.८३ | २.२७ | ३.८४ |
| | **एकुणः** | **२२.८३** | **५९.१३** | **१००** |

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :-**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये गडचिरोली जिल्हयातील कोसरी लघु पाटबंधारे प्रकल्प ता. आरमोरी जि. गडचिरोली या योजनेच्या रु.६१.५३ कोटी (रु. एकसष्ट कोटी त्रेपन्न लक्ष फक्त) किंमतीस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यापैकी रु. ५७.२२ कोटी (रु. सत्तावन कोटी बावीस लक्ष फक्त) कामाप्रित्यर्थ व रु. ४.३१ कोटी ( रु. चार कोटी एकतीस लक्ष फक्त) अनुषंगीक खर्च समाविष्ट आहे. अंदाजपत्रकास उर्वरित कामांसाठी जलसंपदा विभागाची व सार्वजनिक बांधकाम विभागाची सन २०२१-२२ या वर्षाच्या दरसुचीतप्रमाणे दर वापरणयात आले आहेत.